# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ९३–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. दादासो नामदेव यमगर ,<br>रा. कोसारी, ता. जत, जि. सांगली | अर्जदार |

**विरूध्द**

| | |
|---|---|
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, जत, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

**कोरम** :–
१) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी. बी. पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. दादासो नामदेव यमगर , रा. कोसारी, ता. जत, जि. सांगली यांनी परिशिष्ट अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ मधील नियम ६.१० नुसार प्रस्तुतची तक्रार मंचामध्ये दि. १६.४.२०१० रोजी दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे –

तक्रारदार यांनी वितरण कंपनीकडे आपल्या शेतीपंपासाठी नवीन विद्युत पुरवठा मिळावा म्हणून दि. ४.११.२००९ रोजी अर्ज व फी रु. ५०/–पोष्टाने जत कार्यालयाकडे पाठविली. त्याचदिवशी अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष, सांगली येथे रितसर तक्रार दाखल केली. तक्रारदाराचे म्हणण्यानुसार सर्व्हीस कनेक्शन असलेस २० दिवसांत व वितरण वाहिनीचा विस्तार असलेस ३० दिवसांत चलन मिळणे हे कृती मानकांनुसार आवश्यक आहे, परंतु असे चलन त्यांना आजतागायत मिळालेले नाही. अंतर्गत कक्षाने दि. १२.४.२०१० रोजी आदेश केले की, कृती मानके विनियमातील तरतुदी साध्य करण्यात अपयश आल्यास ग्राहकास द्यावयाच्या भरपाईबाबत निर्देश दिले आहेत. तक्रारदाराने अर्ज दिलेल्या तारखेपासून प्रत्यक्ष चलन मिळणे बाबत झालेल्या विलंबाबाबत कृती मानके विनियमानुसार भरपाई मिळावी अशी विनंती केली आहे.

वि.प.ने आपल्या दि. १२.५.२०१० च्या लेखी अहवालात तक्रारदाराने शेतीपंपासाठी अर्ज दि. ६.११.२००९ रोजी अर्ज केल्याचे व त्यांस दि. २६.१२.२००९ रोजी चलन देण्यात आले आहे. तक्रारदाराने चलन भरलेले नाही व चाचणी अहवाल दिलेला नाही. चलन भरलेनंतर व चाचणी अहवाल दिलेनंतर नियमाप्रमाणे कनेक्शन देण्यात येईल. तक्रारदाराचे उच्चदाब वाहिनी ०.७२ कि.मी., लघुदाब वा हिनी ०.१२ कि.मी. लघुदाब वाहिनी व रोहित्र ६३ x १ चे काम करावे लागते असे म्हटले आहे.

सदरची तक्रार मंचासमोर दि. १७.५.२०१० रोजी सुनावणीस घेतली असता, तक्रारदार गैंरहजर, प्रतिनिधी गैंरहजर. वि.प.तर्फे श्री. अे.के. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता, कवठे महांकाळ विभाग व श्री. राठोड, कनिष्ठ अभियंता, जत उप विभाग उपस्थित. वि.प.च्या अधिकाऱ्यांनी चलन उशीरा दिल्याबाबतचे कुठलेही स्पष्टीकरण दिले नाही, परंतु तक्रारदारास वीज जोडणी दिल्याचे कागद दि. ७.६.२०१० पर्यंत हजर करु असे सांगितले. श्री. राठोड यांनी सांगितले की, अंदाजपत्रक मंजुरी क्र. इइ/कएम/एसपीए/ पीई/९५०२२७/ १०५७/९–१० नुसार उच्चदाब वाहिनी (एचटी) – ०.७२ कि.मी., लघुदाब वाहिनी (एलटी) – ०.१२ कि.मी. व रोहित्र १ x ६३ केव्हीए काम करावे लागते. तक्रारदाराने चाचणी अहवाल सादर केलेनंतर एक वर्षाचे मुदतीत त्याचे शेतीपंपास वीज पुरवठा करणेत येईल असे सांगितले. तक्रारदाराच्या पत्रास यापूर्वीच उत्तर देण्यात आल्याचे सांगितले. त्यांना कागदपत्र हजर करण्यास अनुमती दिली. वि.प.च्या दि. ९.६.२०१० च्या पत्रानुसार तक्रारदाराने दि. १४.५.२०१० रोजी कोटेशन भरले आहे परंतु चाचणी अहवाल दिलेला नाही.

यावरुन एक गोष्ट स्पष्ट होते की, दि. ४.१२.२००९ पासून दि. २६.१२.२००९ चलन दिल्याची तारखेपर्यंत २२ दिवसांचा विलंब झाला आहे व या बाबत वि.प.तर्फे कुठलेही स्पष्टीकरण दिलेले नाही. त्यामुळे कृती मानकातील तरतुदीनुसार प्रति आठवडा किंवा त्याच्या भागास रु. १००/– या प्रमाणे ४ आठवड्यांच्या विलंबासाठी रु. ४००/– इतकी भरपाई मिळण्यास तक्रारदार हक्कदार आहे व वि.प.ची ती देण्याची जबाबदारी आहे. मूळ तक्रार चलन देण्यास झालेल्या विलंबाबाबत भरपाई मिळावी यासाठी आहे.

सुनावणीच्यावेळी वि.प.च्या अधिकाऱ्यांनी १४.५.२०१० रोजी तक्रारदारास चलन दिल्याचे सांगितले व करावयाच्या कामासंबंधी दि. ९.६.२०१० च्या पत्रात स्पष्ट केले आहे. तक्रारदाराने अद्याप चाचणी अहवाल सादर केलेला नाही. चाचणी अहवाल दिल्यानंतर व कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर एक वषाने तक्रारदाराचे शेतीपंपास विद्युत पुरवठा करण्यात येईल असे लेखी पत्र मंचासमोर हजर केले आहे. खालील प्रमाणे आदेश ड्ढ

# आदेश

१) तक्रारदाराची तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) वि.प.ने तक्रारदार यांस दि. ४.१२.२००९ ते २६.१२.२०१० या ४ आठवडे विलंबाच्या कालावधीसाठी प्रति आठवडा किंवा त्याच्या भागास रु. १००/- या प्रमाणे रु. ४००/- भरपाई द्यावी.

३) सदर रकमेचे बिलातून समायोजन करण्यात यावे.

४) तक्रारदाराने त्वरीत चाचणी अहवाल देवून कागदपत्रांची पूर्तता करावी. त्यानंतर वितरण कंपनीने दि. ९.६.२०१० चे लेखी पत्रात स्पष्ट केल्याप्रमाणे उच्चदाब वाहिनी (एचटी) - ०.७२ कि.मी., लघुदाब वाहिनी (एलटी) - ०.१२ कि.मी. व रोहित्र १ X ६३ केव्हीएचे काम पूर्ण करुन विहीत मुदतीत ( १ वर्षात ) तक्रारदाराच्या शेतीपंपास वीज जोडणी द्यावी.

५) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

६) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१ यांजकडे करता येईल.

७)

दिनांक : ( बी. जी. पवार )

अध्यक्ष

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :